**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2021: 7.278,
http://www.srjis.com/issues_data?issueId=211
PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, APRIL-MAY, 2023, VOL-11/57
https://doi.org/10.5281/zenodo.7990257

# हिंदू कोड बिल आणि *Mr. and Mrs. 55*

**डॉ. वैशाली दिवाकर**
सेंट मिराज महाविद्यालय, पुणे.

Paper Received On: 22May 2023
Peer Reviewed On: 29May 2023
Published On: 1 June 2023

**एन्टरटेन्मेंट!एन्टरटेन्मेंट!! एन्टरटेन्मेंट!!!**

हे ब्रीदवाक्य चित्रपटांनी आपल्या मनावर सतत ठसविले. चित्रपट हे केवळ करमणुकीचे साधन आहे आणि म्हणून तेवढ्या वेळेपुरते ते बघून विसरून जाण्याची गोष्ट आहे, त्याचा आपल्या आयुष्याशी आणि आपल्या एकूणच विचारप्रणालीशी तसा काहीच संबंध नसतो हा आभास निर्माण करण्यात आपण आणि चित्रपट निर्माते सर्वच यशस्वी झालो. अनेकदा आपण हे ऐकतो कि डोकं बंद ठेवून रोजच्या तणावावर मात करायला काहीतरी करायच आहे तर मग चला सिनेमा बघू. परंतू हे खरं नाही. एकूणच प्रसारमाध्यमे आणि मुख्यतः चित्रपट हे एका पोकळ अवकाशात जन्माला येत नाहीत. तर ती भांडवलशाहीच्या विशिष्ट टप्प्यावर येतात हे लक्षात घेतले पाहिजे. त्याचबरोबर ते एका विशिष्ट सामाजिक-सांस्कृतिक संदर्भात घडविले जातात हे लक्षात घेतल्यास त्यातून घडणारे राजकारण आणि समाजकारण समजून घेणे शक्य होते. आणि म्हणूनच या लेखात आपण बघणार आहोत कि चित्रपट बघणे ही केवळ करमणुकीची गोष्ट नसून ती एक राजकीय कृती आहे.

आपण प्रसारमाध्यमांच्या इतिहासाकडे मागे वळून पहिले असता आपल्याला भांडवलाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळी प्रसारमाध्यमे आलेली दिसतात आणि म्हणूनच त्यांचा राष्ट्रउभारणीच्या प्रक्रीयेमध्ये मोठा वाटा होता. १९व्या शतकाच्या सुरवातीला आलेले छपाई माध्यम एक कल्पित समुदाय निर्माण करते असे मांडले गेले (बेनेडिक्ट अंडरसन, १९८३). वृत्तपत्रांसारखे माध्यम आपल्याला प्रत्यक्षात ओळखत नसलेल्या, देशाच्या वेगळ्या एखाद्या कोपऱ्यात राहणाऱ्या व्यक्तीला सुद्धा आपल्या सामाजिक

विश्वाचा भाग बनविते आणि त्यातूनच एक कल्पित राष्ट्र आकाराला येते. आजच्या प्रगत प्रसारमाध्यमांच्या काळात याच पद्धतीने कल्पित राष्ट्र आणि वास्तव घडविले जाते.

वर वर पाहता निरूपद्रयोगी वाटणारे चित्रपट हे नेहमीच प्रमुखप्रवाही विचारप्रणाली घडवीत असतात-कधी छुप्या पद्धतीने तर कधी अधिक स्पष्ट पद्धतीने! अगदी अलीकडची उदाहरणे बघितली की लक्षात येते कि चित्रपट कशा पद्धतीने ब्राह्मणी, मध्यमवर्गीय, पुरुषप्रधान आणि हिंदू विचारप्रणाली घडवत आणि रुजवत असतो आणि प्रमुखप्रवाही विचारप्रणाली मांडत असतो हे बघितले पाहिजे.

या लेखात चित्रपट हे ज्या सामाजिक सांस्कृतिक अवकाशात घडलेले असतात, त्या अवकाशातील सामाजिक प्रश्न कशा पद्धतीने हाताळतात, ते कसे सोडवतात, ते कसे बदलवतात आणि त्याचे विकृतीकरण करतात किंवा कसे ते प्रश्न झाकून टाकून त्या प्रश्नाचे अस्तित्वच नामशेष करून टाकतात हे पाहणार आहोत (विर्दी, २००७). इतिहासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर आपल्याला चित्रपट हे साचेबध्द, प्रमाणित विचारप्रणालीचे पुष्टीकरण किंवा दृढीकरण करताना दिसतात. मग तो १९३२ मधला स्त्रियांना राजकीय सत्ता मिळाली तर काय होईल हे वर्णन करणारा *अमरज्योती* चित्रपट असेल किंवा १९५५ मधे आलेला स्त्रियांच्या हक्कांची खिल्ली उडवून त्यांना परंपरेत बंदिस्त करणारा *Mr. and Mrs. 55* असेल किंवा २००० च्या दशकात आलेला समलिंगी संबंधाची टिंगल करणारा *दोस्ताना* चित्रपट असेल. कधी विनोद, कधी उपहास तर कधी अतिशोयोक्तीच्या माध्यमातून महत्वाच्या मुद्द्यांवरून समाजाचे लक्ष विचलित केले जाते आणि त्यावर आभासात्मक उपाय सुचविले जातात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा हिंदू कोड बिलाचा आग्रह, त्याची मांडणी, त्याला अभिजनांकडून झालेला विरोध, सामान्य पुरुषांपासून ते राष्ट्रीय नेत्यांपर्यंत सर्वांनी व्यक्त केलेली धास्ती आणि चित्रपटाने या संदर्भात तयार केलेले वास्तव या सर्वांचा आढावा घेण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे.

आपल्या सर्वाना माहितीच आहे कि १९३० च्या दशकांमध्ये कशा पद्धतीने भारतीय स्त्रीची पुनर्व्याख्या केली गेली. भारतीय स्त्रिया ह्या एका बाजूला आधुनिकीकरणाचा रेटा अनुभवत होत्या तर दुसऱ्या बाजूला भारतीयत्व टिकविण्याचे ओझे बाळगत होत्या. पाश्चिमात्त्य स्त्रियांचे अनुकरण करणाऱ्या स्त्रियांविषयी पुरुषांकडून चिंता व्यक्त केली जात होती. अर्थात हे आधुनिकीकरण बाहेरच्या भौतिक जगात जरी काही अंशी मान्य केले तरी घरांतर्गत हे आधुनिकीकरण आणण्याला सख्त विरोध होता. यातून घराचे पावित्र्य धोक्यात येऊन भारतीय अस्मितेला धक्का पोहचू शकतो असा सूर सर्वत्रच होता आणि ही चौकट बहुतांशी उच्चजातीय, मध्यमवर्गीय स्त्रीयानीदेखील मान्य केली होती कारण भारतीय स्त्री पाश्चिमात्त्य स्त्रीपेक्षा तेव्हाच सरस ठरते जेव्हा ती बाहेरच्या जगात तर आधुनिक बनते परंतु तिचे भारतीय अध्यात्मिक स्वत्व नष्ट होऊ देत

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

नाही. या संदर्भात पार्थ चॅटर्जी यांचे विवेचन महत्वाचे आहे. भारतीयत्व टिकवण्याची जबाबदारी ही प्रामुख्याने स्त्रियांवर असल्याने त्यांच्यावर वेगवेगळ्या पद्धतीने बंधने लादली गेली. प्रामुख्याने हिंदू उच्चजातीय स्त्रियांवर नियंत्रण ठेवण्यासाठी वेद, स्मृती या हिंदू ग्रंथांचा आधार घेण्यात आला आणि विवाह हा सर्वोच्च नियंत्रणाचा प्रकार मानला गेला. याच हिंदू ग्रंथांच्या आधारे फक्त पुरुषांनाच असणारा वारसा हक्क, स्त्रियांचा संपत्तीवरील मर्यादित हक्क, बहुपत्नी विवाहाला असलेली मान्यता याचे समर्थन केले गेले. लग्न ही स्वर्गात बांधलेली पवित्र गाठ आहे आणि म्हणून ती मोडण्याचा अधिकार माणसाना आणि मुख्यतः स्त्रियांना नाही.

या पार्श्वभूमीवर १९२१ आणि १९३६ च्या दरम्यान AIWCच्या नेतृत्वाखाली भारतीय स्त्रियांनी हिंदू कायद्याच्या पुनर्रचनेची मागणी केली. १९४४ मधे बी. एन. राव कमिटीने हिंदू कोड बिलाचा मसुदा मांडला. यामध्ये प्रामुख्याने लग्नसंस्था आणि वारसाहक्कावर भर होता. या बिलामार्फत विधवा स्त्रियांना/मुलींनासंपत्तीत अधिकार होता, बहुपत्नीत्व रद्द करण्याची मागणी, आंतरजातीय विवाहाला कायदेशीर मान्यता आणि घटस्फोटाची सोय होती. या क्रांतिकारी मागण्यांना समाजातील अभिजनांकडून जोरदार विरोध झाला. हिंदू पुराणे, मनुस्मृती पुन्हा एकदा नव्याने तपासली गेली आणि स्त्रियांना पुरुषांच्या संरक्षणाची गरज आहे हे मांडले.

अर्थातच समाजातील सनातन प्रवृत्तीने याला जोरदार विरोध केला. केवळ सनातन गटाकडूनच विरोध झाला असे नाही तर हिंदू कोड बिलाच्या मुद्द्यावरून कॉंग्रेस च्या नेतृत्वात देखील फूट पडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बिल संमत करण्याचा आग्रह, हिंदू धर्माची टीकात्मक चिकित्सा अनेक अभिजनवादी राष्ट्रीय नेत्यांना पटली नाही. म.गांधी, सरदार पटेल, राजेंद्र प्रसाद यांनी केलेला विरोध समाजातील या मागासवृत्तीला दुजोराच देतो. बिल संमत न होऊ देण्याच्या सनातन, बुरसटलेल्या प्रवृत्तीच्या विरोधात दिलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राजीनामा त्या वेळच्या समाजातील पुरुषी धास्तीचा निषेध दर्शवितो. या सामाजिक मानसिकतेच्या पार्श्वभूमीवर स्त्रियांचे कायदेशीर हक्क, हिंदू कोड बिलाची मांडणी, त्याला झालेला विरोध, भारतीय स्त्रीचे पाश्चिमात्तीकरण होण्याची धास्ती आणि पर्यायाने भारतीयत्व धोक्यात येण्याची भिती चित्रपटातून कशी मांडली हे बघण्यासाठी आपण *Mr. and Mrs. 55* या चित्रपटाची मांडणी बघणार आहोत.

१९५५ मधे १५ वर्षाच्या विरोधा नंतर हे बिल मान्य झाले. अर्थात मूळ हिंदू कोड बिलाचे पाच कायद्यामध्ये विभाजन करून ते संमत झाले.

१५ वर्षाच्या कालखंडात वेगवेगळ्या गटांकडून या बिलामार्फत स्त्रियांना कायदेशीर अधिकार दिल्यास ते कसे धोकादायक ठरेल याची अतिशयोक्तीपूर्ण वर्णने केली गेली. १९५५ मध्येच आलेला *Mr. and Mrs. 55* हा चित्रपट देखील याला अपवाद ठरत नाही. भारतातील स्त्रियांच्या हक्क आणि सन्मानाच्या संबधीच्या इतिहासाच्या एका महत्वाच्या टप्प्यावरील राजकारणाची चित्रपटामार्फत विनोद वापरून, अत्यंत

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

निर्दयी उपहासाच्या माध्यमातून खिल्ली उडवली जाते. स्त्रियांच्या हक्काच्या केवळ कल्पनेतून पुरुषांना जी धास्ती बसते, तसेच त्यांच्या आणि पर्यायाने भारतीय संस्कृतीच्या अस्तित्वाची त्यांच्यामध्ये जी चिंता निर्माण होते ती कशी योग्य आहे ह्याचे समर्थनच जणू हा चित्रपट करतो. स्त्रियांना अधिकार दिल्यास त्या त्याचा गैरवापर करतील, समाजात अव्यवस्था निर्माण होईल आणि म्हणून स्त्रियांनी पुरुषांच्या संरक्षणात आणि मुख्यतः त्यांच्या अधिपत्याखाली राहिलं पाहिजे, पारंपारिक आणि पवित्र विवाह पद्धतीच कशी योग्य आहे हे हा चित्रपट अधोरेखित करतो.

*Mr. and Mrs. 55* हा चित्रपट अलीकडच्या पिढीने बघितला असण्याची शक्यता कमी आहे परंतु चित्रपट सामाजिक प्रश्न कसे सोडवितो किंवा प्रश्नांची दिशाभूल कशी करतो हे बघण्यासाठी हे एक उत्तम उदाहरण आहे. ह्या चित्रपटातील आत्या, सीता देवी (ललिता पवार) ही स्त्रीवादाची पुरस्कर्ती आहे आणि म्हणून ती पुरुषद्वेष्टी आहे. ती स्त्रियांच्या हक्काविषयी ती केवळ जागरूकच नाही तर अतिशयोक्तीच्या चौकटीत ती आग्रही आहे. ती हिंदू कोड बिलाचा पुरस्कार करते आणि स्त्रियांच्या उन्नतीसाठी ते कसे महत्वाचे आहे हे सर्व स्त्रियांना पटविण्याचा प्रयत्न करत असते. अर्थात चित्रपटामध्ये याला 'घटस्फोट बिल' असे म्हणले आहे---जे सर्वसामन्यांच्या हिंदू कोड बिलाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाशी मिळते जुळते आहे. तरीही महत्वाची गोष्ट म्हणजे या चित्रपटाच्या माध्यमातून प्रथमच स्त्रिया त्यांच्या हक्कांसाठी एकत्र येताना दिसतात, त्या सार्वजनिक जगाचा हिस्सा बनतात. आत्याकडे वाढलेली तिची भाच्ची अनिता (मधुबाला) सुरवातीला आत्याकडे पुरुषद्वेष्टी, स्त्री मुक्तीचा उदो उदो करणारी कैदाशीण म्हणूनच बघत असते पण कालांतराने तिलाही तिचे मुद्दे पटायला लागतात. आपल्या बहिणीचा पुरुषद्वेष्टी स्वभाव लक्षात घेऊन अनिताचे वडील त्यांच्या मृत्युनंतर अनिताने एका महिन्याच्या आत लग्न केले तरच तिला त्यांच्या संपत्तीवर अधिकार सांगता येईल अशी अट घालतात. त्यामुळे वडिलाच्या मृत्युनंतर तिला शोषित लग्नसंस्थेपासून वाचविण्यासाठी आत्या कायदेशीर पेच लढविण्याचे ठरविते. कायदाच स्त्रियांना समान अधिकार देईल या विचारापेक्षा कायदाचा अधिकार वापरुन स्त्रिया मन मानेल तसा कारभार करतील आणि परंपरागत चालत आलेल्या रुढींची खिल्ली उडवतील हाच विचार हा चित्रपट पुढे आणतो. संपत्तीत अधिकार मिळण्यासाठी अनिता, प्रीतम (गुरु दत्त) नावाच्या एका बेरोजगार मुलाशी लग्नाचा करार करण्यासाठी तयार होते. पारंपारिक पवित्र लग्नगाठींचे स्वरूप हे स्त्रियांना मिळणाऱ्या अधिकारामुळे आणि वारसाहक्काच्या हव्यासामुळे करारात्मक होण्याची शक्यता हा चित्रपट मांडतो. प्रीतमला अनिता आधीच आवडत असल्यामुळे प्रीतम या करारासाठी तयार होतो आणि मनातल्या मनात अनिताला ह्या स्त्री वादाच्या, स्त्री मुक्तीच्या कचाट्यातून वाचविण्याचा प्रण करतो. या लग्न कराराच्या बदल्यात त्याला मिळणारा चेक तो वटवत नाही. परंतु अनिताला हे माहित नसल्याने तिच्या

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

मनातील पुरुषांविषयीचा गैरसमज वाढतच जातो. कालांतराने हे प्रकरण कोर्टात जाते. पैशाच्या जीवावर सर्व पुरावे विकत घेण्याचा प्रयत्न आत्या करते परंतु याच काळात अनिताला प्रीतम निर्दोष आणि प्रामाणिकपणे तिच्यावर प्रेम करत असल्याची खात्री पटते. आत्याच्या फूस लावण्यातून आपण चुकीचा विचार करत होतो हे तिला पटते. पश्चातापाच्या आगीत होरपळणारी अनिता स्वतःची चूक मान्य करते. आपले अधिकार मिळविण्याच्या नादात आपण आपले स्त्रीत्व घालवून बसलो अशी भूमिका ती घेते. आत्त्याने फूस लावल्यामुळे तिने इतके जहाल पाऊल उचलले याचा तिला पश्चाताप होतो. स्त्रियांची खरी जागा ही कोणाची तरी पत्नी होण्यातच असते. याच भूमिकेमध्ये तिला सर्वोच्च सन्मान मिळतो आणि त्यासाठी तिला काही अधिकारांवर पाणी सोडायला लागलं तरी ते नैसर्गिकच आहे असे ठसविले जाते. स्त्रीस्वभाव आणि स्त्रीधर्म यातील द्वंद्व परत एकदा आपल्याला बघायला मिळते. उमा चक्रवर्ती मांडतात त्यानुसार चंचल स्त्रीस्वभाव नियंत्रित करण्यासाठी कायद्याची गरज नाही तर स्त्रीधर्म, पतिव्रताधर्माची गरज असते हेच या चित्रपटातून अधोरेखित केले गेले. राजकीय सत्ता किंवा कायदेशीर सत्ता मिळविण्यापेक्षा धर्माच्या चौकटीत राहून, पतिव्रताधर्म पाळून त्यातून मिळणारी सत्ता स्त्रिला खऱ्याअर्थाने सत्ताधारी आणि सक्षम बनवते हे वारंवार या आणि वेगवेगळ्या चित्रपटांमधून ठसविले जाते.

गेल्या काही वर्षांमध्ये, नव उजव्या शक्तींच्या वाढीच्या संदर्भात जेव्हा आपली अस्मिता/ओळख अधिकार-प्राप्त व्यक्ती या आधुनिकीकरणाच्या चौकटीत न होता धर्माच्या चौकटीत मांडली जाते तेव्हा चित्रपट हे "करमणुकीचे" माध्यम काल, आज आणि उद्यादेखील कशा पद्धतीने अधिकारप्रणित मांडणी वगळून धर्मप्रणित विचारसरणी पुढे आणते हे बघणे राजकीय दृष्ट्या महत्वाचे ठरते.

**निष्कर्ष**

चित्रपटांकडे केवळ करमणुकीचे साधन म्हणून न बघता विशिष्ट संस्कृतीशी इमान राखणाऱ्या विचारप्रणालीचे उत्पादन आणि पुनरुत्पादन करणारी व्यवस्था म्हणून बघितले पाहिजे. चित्रपटांमध्ये वापरली जाणारी कथानके, प्रतीके, चिन्हे, नायक-नायिकांची आडनावे, त्यांची जात, वर्ग याचे असणारे संदर्भ या सर्वांच्या विश्लेषणावर भर दिला पाहिजे. या सर्वांचा अर्थ त्या त्या राजकीय, आर्थिक, आणि सामाजिक संदर्भामध्ये लावणे महत्त्वाचे आहे. थोडक्यात चित्रपट कोणत्या विशिष्ट जात वर्गाचे, लिंगभावाधिष्ठीत समाजरचनेचे मुखपत्र म्हणून पुढे येतो हे तपासले पाहिजे. एखादा चित्रपट कोणत्या समाजाच्या बाजूने किंवा कोणत्या समाजाच्या विरोधात उभा राहतो हे समजून घेतल्यावर तो केवळ करमणुकीचे माध्यम न राहता,

समाजातील जातीधिष्ठीत, वर्गाधिष्ठीत आणि लिंगभावाधिष्ठीत सामाजरचनेमधील चित्रपटनिर्मिती ही राजकीय डावपेचाची रणभूमी बनते आणि म्हणूनच चित्रपट पाहणे आणि अभ्यासणे ही राजकीय कृती ठरते.

## ग्रंथसूची


1. Anderson Benedict: Imagined Communities, Verso, UK, 1983

2. Virdi Jyotika: Cinematic Imagination, Ruterge University Press, USA, 2003

३.Chatterjee Partha: Nation and Its Fragments, Oxford University Press, Delhi, 1992.



**Cite Your Article As:**
डॉ. वैशाली दिवाकर. (2023). हिंदू कोड बिल आणि Mr. and Mrs. 55. Scholarly Research Journal for Humanity Science & English Language, 11(57), 47–54. https://doi.org/10.5281/zenodo.7990257


*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*